2018-19

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol. (II)

12 January 2019 Special Issue – 92

भारतीय इतिहासातील स्त्रीयांचे योगदान

राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब

2018-19

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Prof. Gangane R.V.
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

Dr. M.S. Kamble
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN PUBLICATION
Visit to - www.researchjourney.net

28.	हैद्राबाद मुक्तीसंग्रामात महिलांचे योगदान	प्रा.डॉ.साईनाथ शेटोड	67
29.	क्रांतीकारी महिला - डॉ. कॅप्टन लक्ष्मी सेहगल	प्रा. सौ. शिंदे अनिता व्यंकटराव	69
30.	भारतीय स्वातंत्र्य लढयात डॉ. ॲनीबेझट यांच्या कार्याचा अभ्यास	डॉ.पवार रामचंद्र पांडुरंग	72
31.	यादवकालीन स्त्री जीवन आणि संत जनाबाईचे अभंग	प्रा.डॉ.चत्रभुज नारायणराव सोळंके	75
32.	शोदाबाई सावरकर यांचे स्वातंत्र्यलढयातील योगदान	प्रा. शिल्पा शेटे	78
33.	हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील महत्त्वपूर्ण महिला क्रांतिकारक	प्रा.बंडे धनराज वैजनाथ	80
34.	महाराणी येसूबाई यांचे खंबीर नेतृत्व	प्रा. डॉ कृष्णा मालकर	83
35.	19 व्या शतकातील बहुजन समाजातील स्त्रियांचे प्रश्न क्रांतिकारी विचाराने मांडणारी स्त्री ताराबाई शिंदे	डॉ.एस.डी. सावंत	
36.	भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचे योगदान	कुरिल मिनाक्षी पुनमचंद	89
37.	हैदराबाद मुक्तिसंग्रामातील स्त्रियांचे कार्य	प्रा. रामभाऊ देवराव काशीद	92
38.	समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य	प्रा.डॉ.युलिसिस एकनाथ भालेराव	95
39.	किसान सभेच्या इतिहासातील पहिल्या स्त्री शेतकरी नेत्या - कॉ.गोदावरीताई परुळेकर	डॉ. मुकुंद अरविंद देवर्षी	97
40.	स्वराज्य हित रक्षण करणारी महाराज्ञी येसूबाई	प्रा. डॉ. क्षिरसागर बी.एस.	100

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | 12 January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान

भारतीय स्वातंत्र्य लढयात डॉ. ॲनीबेझट यांच्या कार्याचा अभ्यास

डॉ.पवार रामचंद्र पांडुरंग
इतिहास विभाग, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि.बीड (महाराष्ट्र)

प्रस्ताविक -

आधुनिक भारताच्या इतिहासत ॲनी बेंझट यांचे कार्य अनन्य साधारण आहे. भारतंच्या सांस्कृती क इतिहासाचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. भारतीय संस्कृती जगात शांताता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाची आहे असे त्यांनी प्रदिपातन केले. साम्राज्यावादी इंग्लडच्या धोरणा विरोधात भारतात ज्या स्वातयंत्र्या साठी चळवळी झाल्या त्यात तिने हिरिरिणे भाग घेतला स्वांतंत्र्य लढाला प्रोत्साहित करण्यासाठी आणि भारतीयच्या सास्कृतीक जीवनाला पुर्नरुज्जीवित करण्यासाठी ॲनी बेझट ने `होमरुळ ` व थिऑसॉफिकल सोसायटी या सारख्या संघटना स्थापन करुन भारतीय स्वातंत्र्य लढा अधिक तिव्र करण्याचा प्रयत्न केला. ॲनी बेझट परदेशी आयरिस महिला असूनही त्याचा दृष्टीकोण उदारमतवादी व सुधारणावदी होता. भारताला स्वांतत्र्य मिळावे म्हणून अयुष्यभर झगडत राहिल्या जन्माने ख्रिश्चन व मनाने हिंदू असे त्या स्वतःबदल नेहमी म्हणत असत. जन्मभूमिपेक्षा त्यांनी कर्मभूमिला महत्वाचे मानले. भारत ही त्यांची कर्मभूमि होती. भारताच्या स्वातंत्र्य लढयात व समाज सुधाणेत महत्वाची भूमिका पार पाडली. भारतीय संस्कृतीचा त्यानी सखो अभ्यास केला भारतीय शिक्षण पध्दती, समाजसुधारणा व भारतीय स्वातंत्र्यासाठी झालेल्या अदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यांच्या सहभागमुळे स्वातंत्र्य लढा अधिक तिव्र झाला त्यामुळे ब्रिटिश सरकारने 15 जून 1917 रोजी ॲनी बेझट याना मंडाले व वाडिया येथे स्थान बुध्द केले.

17 ऑक्टोबर 1917 रोजी भारतमंत्री मॉटिग्यू याने भारतामध्ये साम्राज्यातर्गत स्वायत सरकार स्थापन करण्याचा उदेश जाहिर केला हे ॲनी बेंझट यांनी केलेल्या अदोलानाचे पहिले यश म्हणता येईल. ॲनी बेंझट या परदेशा मलिा असून ही त्यांनी भारतीय समाजसुधारणा व स्वातंत्र्य प्राप्तीसाठी अयुष्यभर कार्यरत राहिल्या अशा या महानविभूतीचा 20 सप्टेबर 1933 रोजी निधन झाले. आणि भारतीय समाज एका थोर उदारमतवादी ,समाजसुधारक उत्कृष्ट लेखिका अशा विविध केलेल्या कार्यने भारतीयांना या दृष्टानेसतत प्रेरणा मिळाली .

प्रस्तुत शोध निबंध हा परदेशी महिला ॲनी बेंझट यांच्या भारतीय सांस्कृती व स्वातंत्र्य लढयातील योगदानावर आधारित आहे. शोध निबंधसाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. इंग्लडमध्ये जन्मलेली परंतू भारतीय स्वातंत्र्यसौनिक, समाजसुधारक आणि तत्वज्ञानी म्हणून त्यांनी भारतीय राजकारणातील एकनिष्ठ महिला म्हणून त्यांचे कार्य ओळखले जाते.

पुर्वचरित्र - ॲनी बेंझट यांचा जन्म 1 ऑक्टोबर 1847 मध्ये लंडन येथे झाला त्यांच्या वडिल विल्यम पेजवुड व आईचे नाव एम्पिल असे होते. वडिला व्यावसायाने डॉक्टर होते ते आई आदर्श आयरिश स्त्री होती. ॲनी बेझेट पाच वर्षाची असतानाच तिचे वडिल मृत्यू पावले त्यामुळे आईवर मोठे संकट कोसळले आशाही परिस्थातीत ॲनी बेंझटने शिक्षण पुर्ण केले. पुढील शिक्षणासाठी त्या फ्रांन्स व जर्मनी येथे गेली त्यामुळे तिला अनेक भाषांचे ज्ञान आवगत झाले.

इ.स. 1867 मध्ये तिचा परिचये प्रोटेस्टट पंथाच्या धर्म गुरुशी झाला व पुढे ते दोघे विविह बध्द झाले ॲनी बेंझट यांना दोन मुले झाली परंतू त्याचे वैवाहिक जीवन पुर्णत्वास गेले नाही. वैचारिक मतभिन्नतेमुळे इ.स.1877 मध्ये घटस्फोट घेतला. घटस्फोटानंतर ॲ बेझटवर मोठे आर्थिक संकट कोसळले. जीवनचरित्रार्थ तिला ईंग्लडमधील आगपेटयाच्या कारखाण्यात काम करावे लागले. कारखाण्यात काम करित असताना स्त्रिया वर होणाऱ्या अन्याया विरोधात तिने लढा दिला.

गृहितके .

गृहितक म्हणजे ज्याच्या आधारे संशोधन कार्य करता येत असा कार्यवाटक विचार भारतीय स्वातंत्र्य लढव्यात डॉ. ॲनी बेंझट चे योगदान एक अभ्यास.

1. ॲनी बेंझट परकीय असूनही त्यांना भारतीय संस्कृतीचा शोध द्यावयाचा आहे.
2. ॲनी बेझंट यांनी भारतीय संस्कृतीचा शोध घेण्याचे निश्चित केले.
3. ॲनी बेझट यांना भारतीय स्वांतत्र्य चळवळीचा शोध घेण्याचा ठरवले.
4. युरोपियाणाच्या - साम्राज्यवादाला विरोध करणे हे ध्येय होते.
5. थिऑसॅपिकल सोसायटी व वर्तपत्राद्ववारे जनजागृती करण्याचे निश्चित केले.
6. भारतातील अंधश्रध्दा निमुलन करण्याचा ॲनी बेझटचा निश्चत होता.
7. भारतात होमरुल लिंग स्थापण करुन ब्रिटिशा विरुध्द सशस्त्र लढा उभा करणे .
8. पाश्चात्य शिक्षण पध्दतीचा भारतीयानी स्वीकार करावा यासाठी प्रयत्न करणे.

उदिष्टे.

1. ॲनी बेझंट यांनी भारतीय संस्कृतीचे अध्ययने करुन ती पाश्चात्य संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ आहे हे दाखवून दिले.
2. ॲनि बेंझट या परदेशी असून देखील त्यानी भारतीय स्वतंत्र्य लढयात भाग घेवून स्वातंत्र्य लढा अधिक तिव्र केला.
3. ॲनि बेझंट यांनी ब्रिट्रिश साम्राज्यावादाला विरोध करुन स्वशासन निर्माण करण्याचा प्रयत्न केला.
4. थिऑसॅफिकल सोसायटी व वर्तपत्राद्ववारे भारतीय लोकांना जागृत करुन जनअंदोनल उभे केले.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान | 12 January 2019 | UGC Approved No. 40705

5. ॲनिबेझट यांनी अंधश्रध्दा निर्मुलन करुन भारतीय लोंकाना अधश्रद्धेतून बाहेर काढले.
6. होमरुल लींग स्थापण करुन संपूर्ण भारतात ब्रिट्रिशा विरोधी जनअदोलन उभे केले.

सामाजिक कार्य :-

ॲनी बेंझट यांनी समाज उदारासाठी अविरथ प्रयत्न केले. स्त्री-सुधारणा वादी अशा चार्ल ब्रेंड यांच्या `` नेशनल रिफार्म`` मध्ये सहभागी होऊन समाज सुधारनेस सुरुवात केली. पुढे मॅडम हेलेना ब्लाव्हॅटस्की या थियॉसोफिकल सोसायटीच्या अध्यक्षा होत्या त्यांच्याशी ॲनी बेझटीच गाठ पडली आणि त्यांच्या ``सिक्रेट -डॉक्ट्रिन`` हा ग्रंथ वाचला जगाच्या संभाळ करणारी एक अदृश्य शक्ती आहे व ती सदैव सावध आहे यावर बेंझटचा विश्वास होता. त्या विचार प्रचारासाठी इ.स.1893 झाली भारतात आल्या याच बरोबर इंग्लडमधील उदारमतवादी व समाजवादी लोंकाच्या सहवासातही त्या काही दिवस वावरल्या पण त्यांचे समाधान झाले नाही. अमेरिकेतील शिकागो येथे इ.स.1893 मध्ये जागतीक धर्मपरिषद भरली होती. या परिषेदेसाठी भारतातून स्वामी विवेकानंद गेले व त्यांनी भारतीय संस्कृती व हिंदू धर्म याविषयी सविस्तर भाषण केले. ॲनी बेंझट या ही तेथे उपस्थित होत्या. स्वामी विवेकनंदाचे भाषण एकूण त्या हिंदू धर्म व भारतीय संस्कृतीकडे आकर्षक झाल्या आणि पुढे त्यानी भारतालाच आपली कर्मभुमि मानली ॲनीबेझटने बनारस येथे Central Hindu College ची स्थापना केली. या संस्थेचे रुपातर मदन मोहन मालवीय यांनी (बनारस हिंदू विद्यापीठात केले ऐनी बेझटने बनारस विद्यापीठात भारतीय प्राचीन धर्म ग्रंथ वेद उपनिषीदे यांचा अभ्यास केला आणि भारताचा सांस्कृतीक वारसा उज्ज्वला आहे असे प्रतिपादन त्यांनी आपल्या वेळीवेळी केलेल्या भाषणातून सांगितले.

थिऑसॉफिकल सोसायटी - मॅडम ब्लेव्हॅटस्की व कर्नल ऑलकोट यांनी. स्थापन केलेल्या थिऑसॉफिकन सोसाटीच्या त्या सदस्य बनल्या पुढे भारतात थिऑसॉफिकल सोसाटीची स्थापन झाल्यावर त्या 25 वर्षे संस्थेच्या अध्यक्ष राहिल्या राहिल्या या सोसाटीच्या प्रसारासाठी सर्व भारतभर व विदेशातही त्यानी अनेक दौरे काढले. थिऑसाफिकन सोसाटीची वाढ ॲनी बेंझच्या नेतृत्वाखाली झपाटयाने झाली. आपल्या भाषणात त्या थिऑसाफीच्याद्वारे जगात शांतता व विश्वबंधूभाव नांदावा म्हणून उपदेश करीत. त्या सतत सर्व धर्माच्या पुर्नरजीवनासाठी प्रयत्न शील असत.

ॲनी बेंझटच्या मते भारतीयांचे भवितव्य स्त्रियांच्याच हातात असल्याची जाणीव त्यांनी करुन दिली. स्त्रियाच्या विधवा पुर्नविवाहाच्या त्या पुरस्कर्त्या होत्या, तसेच त्यांचा बाल विवाहास विरोध होता.

इ.स.1917 मध्ये ``Women Indian Association भावाची संस्था मद्रास मध्ये स्थापना करुन तिच्या 51 शाखा व 18केद्र असा विस्तार केला. या संस्थेचे प्रमुख उदिष्ट्रे पुढील प्रमाणे होती``.

1. सर्व मुलामुलीला सक्तीचे प्राथमिक व धार्मिक शिक्षण दिले जावे.
2. सर्व स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरिस हक्क मिळाले पाहिजेत.
3. स्त्रियाना मतदानाचा हक्क मिळाला पाहिजे.

ॲनी बेझचे अनखीन एक महत्वाचे कार्य म्हणजे ने. कृष्णमुर्ती यांना घडवून त्यांच्यात जगाला आध्यात्मिक नेतृत्व देण्याची व दिशा दाखीवण्याची योग्यता निर्माण करणे डॉ बेंझट यांनी आपल्या अलौकिक आत्मवर्ती ओळखून त्यांच्यावर शिक्षण संस्कार जे केले ते पुढे कृष्णमुर्ती थिऑसॉपिक्ल सोसाहीतून बाहेर पडले तरी ते एक आध्यात्मिक गुरु म्हणून प्रख्यात झाले.

राजकिय कार्य :-

ॲनी बेंझट यांचे भारताच्या स्वातंत्र्यलढयात महत्वाचे स्थान आहे. इ.स. 1993 पासून त्या राजकीय क्षेत्रात आल्या भारतीय जनतेना स्वतवाची जाणीव करुन दिली. देशभक्ती म्हणजे काय व अन्यायाचा प्रतिकार कसा करावा याचे मार्गदर्शन तिने भारतीयांना करुन दिले. आयर्लंडच्या जनतेने साम्राज्यवादी ब्रिटिशासी राजकीय हक्कासाठी जसा लढा दिला त्याच पध्दतीने भारतीयांने द्यावा. भारताला स्वराज्याचे हक्क मिळालेच पाहिजेत असी त्यांची भूमिका होती. आपला राजकीय विचारांच्या प्रसारासाठी जवळजवळ शंभर पुस्तके व विस हजार पेक्षा जास्त व्याख्याने दिली.

इंडियन होमरुळ लीगची स्थापना :-

सप्टेबर 1916 मध्ये मद्रास येथे इंडियन होमरुळ लीगची ॲनी बेझट यांनी स्थापना केली. पहिल्या महायुध्दाच्या काळात ब्रिटिशांना भारतीय केलेल्या युध्दसहकार्यमध्ये मोबदल्यात भारतीयाना ब्रिटिशांने राजकीय अधिकार द्यावेत अशी बेंझट यांची मागणी होती. सन 1915 मध्ये मुंबईच्या अधिवेशनात होमरुलचा प्रस्ताव त्यांनी मांडला होता परंतु मवाळाचा पठिबा न मिळाल्याने त्यांनी होमरुलचे महत्व जनतेला सांगितले. भारतीय जनता स्वराज्याची मागणी का करते ? याची त्यांनी दोन कारणे दिली.

1. स्वातंत्र्य प्रत्येक राष्ट्राचा जन्मसिध्द अधिकार आहे.
2. भारतीयांच्या इच्छेविरुध्द भारताचे हितसंबध ब्रिटिश सत्तेशी जोडले गेले आहेत. त्या पुढे म्हणतात स्वशासन हे कोणत्याही राष्ट्राच्या प्रतिष्ठेसाठी तसेच आत्मसन्मानासाठी आवश्यक असते. विदेशी शासनामुळे जसी राष्ट्राची क्षमता नष्ट होते तसेच चारित्र्यही नष्ट होते. भारतीयाना भारताच्या राज्यकारभारात स्थान मिळाले पाहिजे हे होमरुल चळवळीचे मुख्ये उद्देश आहे. इ.स.1917 मध्ये या चळवळीला देशव्यापी स्वरुप आले याचवेळी पहिल्या महायुध्याचा सुरु होते. अमेरिकेचे अध्यक्ष वुडो विल्सन यांनी चौदा तत्वाचा जाहिरनामा प्रसिध्द करुन प्रत्येक राष्ट्राला `स्वनिर्णयाचा हक्क मिळवा पाहिजे असे मत व्यक्त केले होते. वुड्रो विल्सन च्या विचाराचा परिणाम म्हणून होमरुळ चळवळ अधिक तिव्र झाली ही चळवळ दडपण्यासाठी ब्रिटिश सरकारणे 15 जुन 1917 मध्ये ॲनी बेंझट व वाडिया यांना [illegible]

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | 12 January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान

त्यानंतर 17 आक्टोबर 1917 रोजी भारत मंत्री मॉटिक्यू यांने भारतामध्ये साम्राज्यअंर्तगत स्वायत सरकार स्थापन करण्याचा उद्देश जाहिर केला. मॅन्टेग्यू घोषणेचे फलित म्हणजे इ.स.1919 चा मॉटिग्यू' चेम्सफर्ड सुधारणा कायदा पास झाला. होमरुळ चळवळीची यामुळे तिव्रता कमी झाली.

भारतीय स्वराज्याचा प्रश्न हाती घेऊन ॲनी बेंझट सपुर्ण भारतभर फिरल्या आपल्या भाषणशैलीने त्यांना भारतीयांच्या मनात आर्दशाचे स्थान निर्माण केले.

भारतीयाच्या मनता स्वातंत्र्याची जागणीव निर्माण केली त्या म्हणत असत की ``तुमची आई मरण पावलेली नाही, ती झोपलेली आहे तुम्ही तिला जागवा`` असा अर्थपुर्ण संदेश त्यानी भारतीयांना दिला. इ.स.1917 मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या आखील

भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या अधिवेशनाच्या त्या अध्यक्ष होत्या. 9 हजार लोकांच्या समोर त्यांना इ.स. 1917 डॉ. बेंझट यांना जेव्हा स्थानबध्द केले तेव्हा हजारो स्त्रिया रस्त्यावर येवून त्यांच्या सुटकेसाठी निदर्शने केली होती. ॲनी बेझटने राजकीय विचाराच्या प्रसारासाठी मद्रास प्रांतातून 1914 मध्ये common will हे साप्ताहिक व New India हे वृत्तपत्र सुरु केले. होमरुल म्हणजे जबाबदार शासनपध्दती होय असे त्या म्हणून लोकमान्य टिकळाप्रमाणेच त्यांनी होमरुळ अंदोलन उभारुन भारतीय स्वातंत्र्याचा सदैव पुरस्कार केला पाकिस्तानातील भारताचे पहिले राजदूत श्री. प्रकाश यांनी ÷Mrs Leader÷ या लिहिलेल्या ग्रंथात ॲनी बेंझटचे वक्तशिरपणा, विलक्षण स्मरणशक्ती, उदारपण आणि आपल्या सहकार्याबद्दल वाटणारा जिव्हाळ इ. गुणाचे स्पष्टीकरण दिले आहे.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवहरलाल नेहरु यांनी लिहिलेल्या ``Discovery of India`` या ग्रंथात ॲनी बेंझटने भारतीय समाजात नवा उत्साह, चैतन्य निर्माण केले होते. त्या एका शहारात आल्या असे वृत समजताच शहरात व स्फूरण निर्माण होई. पण त्या मुलगामी विचारवंत नव्हत्या असाही त्यांच्यावर आक्षेप घेतला जातो.

लोकमन्य टिळक, बॅ. जिन्ना व महात्मागांधी यांनी ॲनी बेंझटच्या व्यक्तित्वाची प्रशसा करताना म्हटले की, त्या भारताला मातृभूमि समजत होत्या. भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपले बलिदान देण्यासही त्या तत्पर होत्या.

निष्कर्ष -

अधुनिक भारताच्या इतिहासात ॲनी बेझट याचे कार्य अतिशय महत्वपूर्ण आहे त्या जन्माने आयारिश महिला असून ही, त्यांना भारतीय समाज सुधारणेविषयी तळमळ होती. स्त्रियावरील अन्याय दूर करण्यासाठी त्या सदैव तत्पर असत. प्राचीन भारतीय संस्कृती व हिंदू धर्म जगात शांतता व स्थर्य निर्माण करु शकतो अशी त्यांची धारणा होती. आपल्या विचाराच्या प्रसारार्थ त्यांनी थिआसॉफिकल सोसाटीची स्थापना केली. भारतातील शिक्षण पध्दती, समाजसुधारण व भारतीय स्वातंत्र्यासाठी झालेल्या अदोलनात सक्रिय असत. इंडियन होरुळ लीग या सारखी चळवळ उभी करुन त्यांनी भारतीयांच्या मनात स्वशासना जाणीव निर्माण केली. व स्वराज्य विषयी जन्माने परदेशी व कर्माने भारतीय असल्यामुळे त्या जन्मभूमिपेक्षा कर्मभूमिला आधिक महत्व देत असत कर्मभूमिच्या स्वातंत्र्यासाठी स्वत:चे बलिदान देण्यासठी त्या तयार असत. 15 ऑगस्ट 1747 मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु स्वातंत्र्या मिळण्या पुर्वीच त्याचा मृत्यू 20 सप्टेबर 1933 मध्ये झाला भारतीय संस्कृतीचा त्यांनी पुर्ण अभ्यास केला होता. अंदोलनात त्याच्या सहभाग महत्वपुर्ण होता.

संदर्भ ग्रंथ

1. डॉ. गाठाळ एस.एस, भारताचा इतिहास व संस्कृती, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
2. डॉ.प्र.न.देशपाडे, आधुनिक भारताचा इतिहास, विद्याबुक पब्लिशर्स औरंगाबाद.
3. प्रा.डॉ. गायकवाड श्रीकांत व प्रा. मांजर रामकिसने, भारतातील सामाजिक चळवळी, अरुणा प्रकाशन, लातूर.
4. डॉ. गाठाळ एस.एस, भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगापुरा, औरंगाबाद.
5. डॉ. गाठाळ एस.एस, आधुनिक भारत इ.स.1857 ते 1950 कैलास.पब्लिकेशन्स पुणे .
6. पाटील पद्यजा व जाधव शोभना भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
7. ॲनी बेंझट - विकिपीडिया.